सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे ४११ ००७

संदर्भ: विविमं/२०२५–२६/८५१ अत्यंत महत्त्वाचे दिनांक : २५ एप्रिल, २०२६

**पुणे ग्रामीण व पुणे पिंपरी–चिंचवड शहर विभागाच्या लेखा परीक्षणच्या ठिकाणातील बदल**

प्रति,
मा. प्राचार्य/ मा. संचालक,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित **फक्त पुणे ग्रामीण व पुणे पिंपरी–चिंचवड शहर विभागातील** विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या योजना राबविणारी सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

विषय :– पुणे ग्रामीण व पुणे पिंपरी–चिंचवड शहर_विभागाच्या केंद्रीय लेखा परीक्षणाच्या ठिकाणातील बदल
संदर्भ :– या विभागाचे विविमं/२०२५–२६/८२१, दिनांक : १५ एप्रिल, २०२६ चे पत्र

मा. महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मधील विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत **पुणे ग्रामीण व पुणे पिंपरी–चिंचवड शहर विभागातील** महाविद्यालयीन लेख्यांचे केंद्रीय परीक्षण अनुक्रमे मंगळवार, दिनांक २८ एप्रिल व बुधवार, दिनांक २९ एप्रिल, २०२६ रोजी **संत ज्ञानेश्वर सभागृह, मुख्य इमारत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे या ठिकाणी** आयोजित करण्यात आले असल्याचे आपणास कळविण्यात आले होते.

परंतु आत्ता या ठिकाणात बदल करण्यात आलेला असून **मंगळवार, दिनांक २८ एप्रिल रोजीचे पुणे ग्रामीण व बुधवार, दिनांक २९ एप्रिल, २०२६ रोजीचे पुणे पिंपरी–चिंचवड शहर विभागाचे केंद्रीय लेखा परीक्षण पर्यावरणशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात** येथे आयोजित केले आहे. याची नोंद घ्यावी.

त्यानुसार आपण संबंधित विभागांना/विद्यार्थी कल्याण अधिकारी/कार्यक्रम अधिकारी यांना **पुणे ग्रामीण व पुणे, पिंपरी–चिंचवड शहर विभागाच्या केंद्रीय लेखा परीक्षणाच्या सुधारित ठिकाणी उपस्थित** राहून ती कार्यवाही करण्याबाबत अवश्य सूचित करावे. कळावे, ही विनंती.

(प्रा. डॉ. गणेश भामे)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

(डॉ. सविता कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ